स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

समाजशास्त्र विद्याशाखा अंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पी.एच.डी.

पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा

प्रारूप आराखडा (Synopsis)

संशोधन विषय

जागतिकीकरणानंतर भारतीय आयुर्विमा महामंडळावर झालेला आर्थिक परिणाम : विशेष संदर्भ रायगड जिल्हा

संशोधक मीना किशन सरपाते

मार्गदर्शक

प्रा. डॉ. निलकंठराव पाटील,

अर्थशास्त्र विभाग प्रमुख

प्रतिभानिकेतन महाविद्यालय, नांदेड

मार्च 2016.

जागतिकीकरणानंतर भारतीय आयुर्विमा महामंडळावर झालेला आर्थिक परिणाम : विशेष संदर्भ रायगड जिल्हा

आज आधुनिक जगात व्यक्तीला जीवन जगत असताना. अनेक प्रकारचे धोके व अनिश्चिततेला सामोरे जावे लागत आहे. हे धोके व अनिश्चितता कमी करण्यासाठी 'विमा' या योजनेचा जन्म झाला. व्यक्तीला जीवन जगत असतांना जीवनातील धोके व अनिश्चितता कमी करण्यासाठी विमा योजनेचा उपयोग होतो. तसेच व्यक्तीच्या मृत्युनंतर त्यांचा कुटूंबीयांना आर्थिक मदत विमा योजनेमुळे मिळू शकते.

विम्याची कल्पना खूप जुनी आहे. धोका अथवा जोखिम अनेक व्यक्तीमध्ये कशा पध्दतीने विभागता येईल ही त्यामागील प्रमुख कल्पना आहे. इ.स. पूर्व 2000 वर्षापासून चिनी आणि बॅबिलेनियम संस्कृतीमधील व्यापा–यांनी सर्व प्रथम विम्याची पध्दत सरू केली. भारतात विम्याची कल्पना वैदिक काळापासून लिखाणात वाचायला मिळते. मनुस्मृती याज्ञवाक्य कौटिल्यांचे, अर्थशास्त्र या पुस्तकात विम्याचा उल्लेख आढळतो. इ.स. 1680 मध्ये निकोलस व बीॅन यांनी दि. फायर ऑफिस नावाची विम्याची एक 'आग विमा कंपनी' स्थापन केली.

विमा :– विमा म्हणजे संभाव्य नुकसानाची शक्यता गृहित धरून ती कमी करण्याची योजना म्हणजेच जोखिम व्यवस्थापनाचा उपाय होय.

विम्याची संज्ञा :– विमा हा एक करार (पॉलिसी) आहे. जो एका विमा उतरवलेल्या व्यक्ती किंवा घटकाचे विमा कंपनी तोटयापासून आर्थिक संरक्षण किंवा परतफेड प्राप्त करून देत आहे.

विम्याच्या संकल्पनेमध्ये पुढील प्रकारच्या विम्याचा समावेश होतो.

1) जलविमा 2) अग्नीविमा 3) आयुर्विमा 4) सर्वसाधारण विमा

व्यवसायीक दृष्टीकोनातून विम्याचे पुढील तीन प्रकार पडतात.

1) आयुर्विमा

2) सर्वसाधारण विमा

3) सामाजिक विमा

वित्तीय अनिश्चितता कमी करण्यासाठी आयुर्विमा या संकल्पनेचा अभ्यास करणे. महत्वाचे आहे. आयुर्विमाचे महत्व खाली तीन घटकामुळे स्पष्ट होते.

1. व्यक्तीचा फायदा 2. विशेष संस्था किंवा समुहाचा फायदा उदा. व्यावसायीक समुह, उद्योग 3. सामाजिक उपयोग.

आयुर्विमा हा असा करार आहे की, जर अनैच्छिक घटना घडल्यास विशिष्ट रक्कम देण्याची शाश्वती म्हणजेच आयुर्विमा होय. अशा प्रकारच्या करारात विशिष्ट मुदतीनंतर अथवा अनपेक्षीत मृत्युनंतर ठरविलेली रक्कम एल.आय.सी. धारकाला दिली जाते. आयुर्विमा महामंडळ अशी संस्था आहे की, धोक्याचे प्रमाण कमी करून अनिश्चितेचे निश्चितीमध्ये रूपांतर करते. एल.आय.सी जीवनासोबत ही आणि जीवनानंतरही असते. कुणीतरी मरणार आहे म्हणून नव्हे तर कुणाला तरी जगता यावे म्हणून आयुर्विम्याची गरज आहे. हा आयुर्विम्याचा एक मुलभूत सिध्दांत आहे.

भारतीय आयुर्विम्याची स्थापना :– आयुर्विमा आपल्या आधुनिक रूपात 1818 मध्ये इंग्लंडव्दारे भारतात आला. त्यांनतर आयुर्विमा कंपन्यांमध्ये अनेक बदल झाले. अलेक आयुर्विमा कंपन्या स्थापन झाल्या. विसाव्या शतकात भारतात 44 आर्युविमा कंपन्या होत्या. त्यांची संख्या वाढून 1938 मध्ये 176 इतकी झाली. द इन्शुरंन्स ॲक्ट 1938 या भारतातील कायदयाव्दारे विमा कंपन्यांवर राज्यसरकारचे नियंत्रण लागू झाले. या दरम्यान विमा कंपन्यांचे राष्ट्रीयकरणांची मागणी सुरू होती. ब–याच वर्षानंतर म्हणजे 18 जानेवारी 1956 मध्ये विमा कंपन्यांचे राष्ट्रीयकरण झाले. राष्ट्रीयकरणाच्या वेळी भारतात 154 आयुर्विमा कंपन्या, 16 विदेशी कंपन्या 75 प्रेविंडेड संस्था कार्यरत होत्या. भारतीय आयुर्विमा महामंडळाचे मुंबई मध्ये मुख्य कार्यालय असून 8 झोनल ऑफीस एक कारपेट कार्यालय 2048 शाखा कार्यालय आणि 113 डिव्हिजनल ऑफीस आहे.

विसाव्या शतकाच्या मध्यंतरी (15 ऑगष्ट 1947) भारत स्वातंत्र झाला. आर्थिक विकासाचे राष्ट्रीय उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि समाज उपयोगी सेवा सार्वजनिक क्षेत्राव्दारे पुरविण्यासाठी समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. पुढे

चालून 1991 ला भारताने नविन आर्थिक धोरणाचा स्विकार केला. याला 'आर्थिक सुधारणा ' असे म्हटले गेले. या धोरणानुसार भारतातील अनेक खाजगी उद्योगांना असणा–या अटी शर्ती काही प्रमाणात शिथिल करण्यात आल्या. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी परदेशी थेट गुतवणूकीला प्रोत्साहन देण्यात आले. अनेक खाजगी उद्योगात परदेशी थेट गुंतविणूकीची मर्यादा वाढविण्यात आली.

जागतिकीकरण आणि भारतीय आयुर्विमा महामंडळ :–

दुस–या महायुध्दानंतर जागतिकीकरण ही प्रक्रिया सुरू झाली. आंतराष्ट्रीय व्यापारातील अवरोध हा गॅट (1946) च्या माध्यमातून कमी करण्यात आला.

पुढे गॅट ची जागा WTO ची अधिकृत स्थापना 1 जानेवारी 1995 मध्ये 123 देशाच्या सहीने/मान्यतेने झाली. WTO जागतिक व्यापार संघटनेमुळे जागतिकीकरणाची प्रक्रिया ही अधिक वेगाने सुरू झाली.

जागतिकीकरण :– ''जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तुची किंवा घडामोडीची जागतिक स्तरावर स्थानांतरणाची प्रक्रिया होय.''

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत व्यापार विदेशी थेट गुतवणूक भांडवल प्रवाह, प्रवास आणि तंत्रज्ञान यांच्या प्रसाराच्या माध्यमाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी उघडे केले जाते.

भारतात 1991 च्या सुमारास जागतिकीकरणाला सुरूवात झाली. या काळात देशावरचे विदेशी कर्ज एवढे वाढले होते की, जागतिक बॅक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधि या खाजगी संघटनांनी भारताला आणखी कर्ज देणे नाकारले व कर्ज मिळविण्यासाठी भारतावर काही अटी लादल्या. या अटींमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेत धोरणात्मक बदल करून तिला विदेशी कंपन्यांसाठी खुले करणे असे होते. अर्थव्यवस्थेतील या बदलांला आर्थिक सुधारणा म्हटले गेले. यामध्ये जागतिकीकरणा बरोबर उदारीकरण, खाजगीकरण, यांचा समावेश झाला. या धोरणांचा भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध

क्षेत्रांवर परिणाम झाला. या जागतिकीकरणाचा भारतीय आयुर्विमा महामंडळावर काय परिणाम झाला हे पाहणे संयुक्तीक आहे.

1999 च्या अधिनियमानुसार भारतीय बीमा नियामक आणि विकास प्राधिकरणा (IRDA) परवानगीनंतर विमाक्षेत्रात 26 टक्के प्रत्यक्ष थेट गुंतवणूक केली जावू शकते. भारतीय आयुर्विमा महामंडळाची स्थापना 1 सप्टेबर 1956 रोजी करण्यात आली. तर सुमारे 2000 पर्यंत विमा क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्राचा प्रभाव होता. आज 23 खाजगी विमा कंपन्या सुध्दा विमा क्षेत्रात काम करत आहेत. आजच्या आधुनिक जगातील व्यक्तीचा जीवनातील धोक्याचे प्रमाण कमी करून अनिश्चिततेचे रूपांतर निश्चितीमध्ये करणा—या भारतीय आयुर्विमा महामंडळाची जागतिकीरण नंतर झालेल्या आर्थिक प्रगतीचा अभ्यास करणे महत्वाचे वाटते. तसेच 2016 मध्ये भारताने स्वीकारलेला 1991 च्या आर्थिक धोरणाला 25 वर्षे पूर्ण होत आहेत. तर भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या स्थापनेला 60 वर्ष पूर्ण होत आहेत. जागतिकीकरणाचा भारतीय आयुर्विमा महामंडळावर काय परिणाम झाला हे पाहणे महत्वाचे वाटते.

तसेच 2016 मध्ये भारताने स्वीकारलेला 1991 तर भारतीय आयुर्विमा मंडळाच्या स्थापनेला 60 वर्षे पूर्ण होत आहेत. त्यामुळे जागतिकीरणाचा भारतीय आयुर्विमा महामंडळावर काय परिणाम झाला हे पाहणे महत्वाचे वाटते.

1 विषय निवडीचा हेतू

प्रत्येक राष्ट्राचा आर्थिक विकास हा त्या राष्ट्रातील वित्तीय व्यवस्थेच्या विकासावर अवलंबून असते ज्या राष्ट्रात वित्तीय व्यवस्थेचा विकास जास्त त्या राष्ट्राचा विकास जास्त होतो. वित्तीय व्यवस्थेचे दोन भाग पडतात ते म्हणजे

1 वित्तीय संस्था 2 बिगर वित्तीय संस्था

बिगर वित्तीय संस्थामध्ये आयुर्विमाचे महत्त्व अलिकडील काळात मोठा प्रमाणात वाढत आहे. त्याचे कारण म्हणजे लोकामध्ये आयुर्विमा विषयी प्राप्त झालेले ज्ञान आयुषातील वाढत असलेले धोके आणि अनिश्चितता होय.

भारताचा विचार केल्यास जागतिकीकरणानंतरच्या काळात विमा व्यवसायामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तरीपण आज भारतामध्ये 30% लोकांपर्यत विमा पोहचला आहे. जागतिकीरणानंतर ही भारतीय आयुर्विमा महामंडळाचे विमा व्यवसायात आतापर्यत सर्वात जास्त योगदान असून समाजाचे आर्थिक आणि सामाजिक विकासात वाटा आहे. तरी रायगड जिल्हयातील भारतीय आयुर्विमा महामंडळाचे नेमके कोणते योगदान आहे. तसेच त्याची व्याप्ती आर्थिक परिस्थिती कशी आहे याचा शोध घेण्याच्या हेतूने प्रस्तुत विषय संशाधनासाठी निवडण्यात आला आहे.

2 अभ्यासाचे महत्व :– प्रस्तुत संशोधनात रायगड जिल्हयातील भा. आ. म. अभ्यास करण्यात येईल. यासोबत रायगड जिल्हयातील भा.आ.म. समाजिक व आर्थिक योगदानाचा विश्लेषण करण्यात येईल. तसेच रायगड जिल्हयातील भा.आ.म. व्यवसाय इतर खाजगी विमा कंपन्यांचा व्यवसाय इत्यादिंचा अभ्यास करण्यात येईल. तसेच विमा तळागाळातील लोकांपर्यत पोहचण्यासाठीच्या उपाययोजना, धोरण, अंमलबजावणी संदर्भातील सुचना देण्यात येतील.

3 संशोधन पध्दत :– जागतिकीकरणानंतर भारतीय आयुर्विमा महामंडळावर झालेल्या परिणाम : विशेष संदर्भ रायगड जिल्हा विषयाच्या संशोधनासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल. विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीत उपलबध असणा–या सामग्रीच्या आधारीत विश्लेषण करण्यात येईल. त्याचबरोबर वर्णणात्मक संशोधन पध्दतीत रायगड जिल्हयातील भारतीय आयुर्विमा महाम्रडळाव्दारे राबविण्यात आलेल्या योजनांचा लाभ व अंमल बजावणी तसेच रायगड जिल्हयातील लोकांच्या विकासात भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या योगदानाचे वर्णन करण्यात येईल.

4 नमुना निवड : संशोधकाने संशोधनाचे जागतिकीकरणानंतर भारतीय आयुर्विमा महामंडळावर झालेला परिणाम : विशेष संदर्भ रायगड जिल्हा या विषयाचे अध्ययन करण्यासाठी सहेतुक/उद्देशपूर्ण नमूना निवड केली आहे. अभ्यासाच्या काळातील एकूण बिझनेस इनफोर्से पॉलिसीज् (चालू विमा पॉलिसी) लक्षात घेवून त्यापैकी 0.2 % नमूना निवड घेण्यात येईल. नमूना निवड करण्यासाठी नेमण्यात आलेल्या एरा सेझीयन समितीने भारतातील एकूण Business inforce च्या आधारे संशोधकाने संशोधनासाठी रायगडजिल्हयातील एकूण Business inforce च्या 0.2 % नमूने निवडलेले आहे

5 तथ्य संकलन : प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व व्दितीय स्त्रोताचा उपायोग करण्यात येईल. प्राथमिक स्त्रोतातही प्रामुख्याने रायगड जिल्हयातील एकूण बिझनेस इनफोर्सेसचा 0.2 % विमाधारकांचे ग्रामिण व शहरी भागातून नमूना निवड केली जाईल. सर्वेक्षण प्रत्यक्ष मुलाखती प्रश्नावली, निरीक्षण व अनुसूची या प्राथमिक स्त्रोताव्दारे तथ्यसंकलन केले जाईल. कार्यालयीन कागदपत्रे, मासिके, साप्ताहिके, नियतकालिके, IRDA व भारतीय आयुर्विमा महामंडळाचे अहवाल इत्यादि व्दितीय स्त्रोताच्या माध्यमातून तथ्य संकलन केले जाईल.

6 **संशोधनाची उद्दिष्टे**

1) भारतीय आयुर्विमा मंडळाची रचना व स्वरूपाचा अभ्यास करणे.

2) जागतिकीरणानंतर भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या प्रगतीचे आर्थिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

3) रायगड जिल्हामधील भारतीय आयुर्विमा मंडळाच्या आर्थिक प्रगतीचा अभ्यास करणे.

4) रायगड जिल्हामधील ग्रामिण भागातील बचतीचा अभ्यास करणे.

5) रायगड जिल्हामधील वेगवेगळया गटातील विमा धारकाचा अभ्यास करणे.

6) भारतीय आयुर्विमा महमंडळा मुळे विमा धारकाला झालेल्या फायदयाचे मूल्यमापन करणे.

7) रायगड जिल्हयामधील भारतीय आयुर्विमा मंडळ व इतर खाजगी विमा कंपन्यांच्या आर्थिक प्रगती या अभ्यास करणे.

8) रायगड जिल्हामधील बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीत आयुविम्याचे योगदान अभ्यासने.

संशोधनाची गृहीते :–

1) रायगड जिल्हामधील जागतिकीरणानंतर भारतीय आयुर्विमा मंडळाची आर्थिक प्रगती झाली.

2) रायगड जिल्हामधील भारतीय आयुर्विमा मंडळाकडून विम्यासंदर्भात मिळणा–या सेवेमध्ये सुधारणा झाली आहे.

3) रायगड जिल्हयामधील जागतिकीरणानंतर भारतीय आयुर्विमा महामंडळा व खाजगी विमा कंपनीमधील स्पर्धेमुळे ग्राहकाला चांगल्या विविध प्रकारच्या विमा योजना उपलब्ध होत आहेत.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

जागतिकीरणानंतर रायगड मधील विमा धारकाला झालेल्या फादयाचे मुल्यमापन करणे विमा क्षेत्रातील खाजगी संस्थांच्या प्रवेशाचा भारतीय आयुर्विमा मंडळ वरील झालेला परिणाम अभ्यासने. तसेच खाजगी विमा कंपन्याचा भारतीय आयुर्विमा मंडळ वरील झालेला परिणाम अभ्यासने

जागतिकीरणानंतर रायगड जिल्हयामधील विमाधारकाला मिळालेला विमा योजनेचे व फायदयाचे मूल्यमापन करणे. संशोधनाचा अध्ययन कालावधी 2000 ते 2015 घेण्यात येईल

प्रकरण रूपरेषा :–

प्रकरण – 1

प्रास्ताविक

1 : 1 अभ्यासाचे महत्व

1 : 2 संशोधनाचे उद्दिष्ट

1 : 3 संशोधनाची परिकल्पना

1 : 4 संशोधन पध्दती

1 : 5 नमूना निवड

1 : 6 संशोधनाची व्याप्ती

1 : 7 संशोधनाच्या मर्यादा

1 : 8 साहित्य पूर्वलोकन

प्रकरण – 2

2 : 1 विम्याची संकल्पना

2 : 2 विम्याचा अर्थ, गरज महत्व

2 : 3 विम्याचे स्वरूप आणी व्याप्ती

2 : 4 विम्याचे प्रकार

2 : 5 आयुर्विम्याचा इतिहास / पार्श्वभूमी

2 : 6 आयुर्विमा म्हणजे काय ?

2 : 7 भारतीय आयुर्विमा महामंडळाचा इतिहास

2 : 8 भारतीय आयुर्विमा महामंडळाची स्थापना

2 : 9 भारतीय आयुर्विमा महामंडळाची प्रगती

2 : 10 रायगड जिल्हयातील भारतीय आयुर्विमा महामंडळाची प्रगती

प्रकरण – 3

3 : 1 जागतिकीकरणाची व्याख्या, अर्थ.

3 : 2 जागतिकीकरण

2 : 3 जागतिकीकरणानंतर आयुर्विमा महामंडळाच्या अभ्यासाचे महत्व.

प्रकरण – 4

4 : 1 रायगड जिल्हा वरील एक दृष्टीक्षेप

4 : 2 रायगड जिल्हयातील भारतीय आयुर्विमा महामंडळाची व विमा खाजगी संस्थांच्या प्रगतीचा अभ्यास

प्रकरण – 5

5 : 1 तथ्य संकलनाचे सारणीकरण व विश्लेषण

प्रकरण – 6

निष्कर्ष,

सुचना शिफारशी

संदर्भसूची :–

1) M. N. Mishra Insurance Principles and practice S. Chand 2003 Ram Nagar New Delhi – 110055.
2) Wikipedia org / Insurance
3) Dall & sundaram Indian Ecoonomy 66th edition 2015 S. Chand Ram Nagar New Delhi – 110055.
4) विठ्ठल सोनटक्के, प्रा. देवराव मनवर आथिक वृध्दी आणि विकास 2014 Sheth Pubisher Mumbai
5) www.Licindia.in
6) जागतिकीकरण समस्या आशय आणि अनुभव सी. प. खेर दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
7) प्रतियोगिता साहित्य सीरीज संपादक डॉ. जे. पी. मिश्रा साहित्य भवन आगरा उत्तर प्रदेश.
8) एल.आ.सी. चा वार्षिक अहवाल 2013–14
9) एल.आ.सी. चा वार्षिक अहवाल 2012–13
10) IRDA चा वार्षिक अहवाल 2012 – 13
11) www. Shadhganga infibnet ac. in

संशोधक
मीना किशन सरपाते

मार्गदर्शक
प्रा. डॉ. निलकंठराव पाटील,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
प्रतिभानिकेतन महाविद्यालय, नांदेड